# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३**

**(सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)**

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ३)**

(१) **सर्वश्री.सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर जिल्हयातील काटोल येथील मे.नानक कन्स्ट्रक्शन (भागीदारी संस्था) या संस्थेनी नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत संगनमत करून करोडो रूपयांच्या बांधकामाची कामे मिळविणे,या बांधकामात मोठया प्रमाणात गैरप्रकार करणे, संस्थेनी या बांधकामासाठी जिल्हा परिषदेत ठेवलेली अनामत रक्कम कोणत्याही अधिकाऱ्यांची परवनगी न घेता मुदतीच्या अगोदरच खोट्या स्वाक्षरी करून संस्थेने उचल करणे, या करोडोच्या व्यवहारात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अंधारात ठेवण्यात येणे, झालेल्या करोडो रूपयांच्या गैरप्रकाराची तक्रार जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागपूर येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येणे,नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मे.नानक कंस्ट्रक्शन (भागीदारी संस्था) या संस्थेला काळया यादीत टाकण्यात यावे याबाबतचा प्रस्ताव दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी कक्ष अधिकारी (बांध-२), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात येणे, दोन महिन्याचा कालावधी होऊन सुध्दा अद्यापही सदर प्रस्तावावर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिकात पसरलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामुळे नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी पाठविलेला प्रस्तावावर कार्यवाही होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(२) श्री.दत्तात्रय भरणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती मालोजीराजे यांचे पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात इंदापूर शहरात वास्तव्य असणारे शिवभारत या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाचा समकालीन इतिहास असणारे संदर्भ ग्रंथ यामधील उल्लेखात हा भुईकोट किल्ला (जुनी तहशील कचेरी) हे वास्तव्याचे ठिकाण असणे, प्रशासकीय दृष्टीने सदरील जागा ही महसूल विभागाकडे दप्तरी नोंद असणे, महसूल विभागाच्या नोंदीमध्ये मालोजीराजांच्या इतिहासाच्या बाबींचा उल्लेख असणे, या किल्ल्यासमोर ग्रामदैवत इंद्रेश्वराचे मंदिर आजही असणे, मालोजीराजे सकाळी आपला दिनक्रम अमरेश्वराच्या दर्शनाने करत असत असाही संदर्भ शिवभारत या शिवरायांच्या राज्यकारभारातील समकालीन लिहला गेलेल्या एकमेव अस्सल साधनात असणे, म्हणुन इतिहासाची साक्ष असणाऱ्या इंदापुर शहरातील इतिहासाला उजाळा देण्यासाठी या आजची जुनी कचेरी म्हणजेच मालोजी राजे यांच्या गढीचे शासनाने संवर्धन करून जुने बुरुज गाव वेस बुह्यरे यांचे पुनर्जीवन करून या कचेरीच्या जागेतच छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांचे स्मारक करून मालोजी राजेंच्या पादुका यांच्या साठीही दगडी मूळ स्वरूपाचा चबुतरा उभारून मालोजीराजे भोसले यांचे जीवनचरित्र महाराष्ट्रासमोर आणण्यासाठी पर्यटन विभागाकडून करणेबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री.बळवंत वानखडे, मनोहर चंद्रिकापुरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी पदोन्नती मधील आरक्षण लागू करण्यास शासन निर्णय दिनांक २५ मे, २००४ रद्द केलेला असणे, एम. नागराज विरूद्ध भारत सरकार (२००६) या निर्णयानुसार मागासलेपणा, अपर्याप्त प्रतिनिधित्व व प्रशासनाची कार्यक्षमता यावर आधारित आकडेवारीचा नविनतम अहवाल महाराष्ट्र शासनाने सादर न केल्यामुळे सदर शासन निर्णय रद्द करण्यात आलेला असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरूद्ध शासनाने महाराष्ट्र शासन विरूद्ध विजय घोगरे (**SLP No.**२८३०६/२०१७) ही विशेष अनुमती याचिका माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयास सादर केलेली असणे, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी मागासलेपणा सिद्ध करण्याची अट रद्द केली व इतर दोन अटींप्रमाणे अभ्यास अहवाल तयार करून त्यानुसार पदोन्नती मधिल आरक्षण वैध ठरविले असणे, केंद्र सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक १५ जुलै, २०१८ रोजी पदोन्नतीमधिल आरक्षण लागू करण्यासाठी मार्गदर्शक सुचना जारी केलेल्या असणे

त्यावर शासनाने कोणतीच कार्यवाही केलेली नसणे दिनांक ७ मे, २०२१ च्या शासन आदेशाप्रमाणे मागासवर्गीयांचा पदोन्नती मधिल ३३% वाटा खुल्या प्रवर्गात बेकायदेशिररित्या वर्ग केलेला असणे , परंतु अशाप्रकारचे कोणतेही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले नसणे अथवा मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाने दिलेल्या नसणे, दिनांक २८ जानेवारी, २०२२ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपुऱ्या प्रतिनिधीत्वाचा संख्यात्मक डाटा गोळा करून पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्याचे अधिकार राज्य शासनास असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले असणे, अपुऱ्या प्रतिनिधीत्वाचा अहवाल शासनाने तयार केला असणे व तो सर्वोच्च न्यायालयात सादर केला असणे, परंतु केवळ महाराष्ट्र शासनाची याचिका क्र.२८३०६/२०१७ निकाली निघाली नाही या कारणाखाली अजूनपर्यंत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना / अधिकाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्यात आले नसणे व सेवाज्येष्ठतेनुसार वरिष्ठ असलेल्या मागासवर्गीयांना दिनांक २५ मे, २००४ च्या सेवाज्येष्ठतेची अट घालून त्यांना खुल्या प्रवर्गातून पदोन्नती मिळणे सुद्धा बंद झाले असणे, त्यामुळे सन २०१७ ते २०२२ या कालावधीत राज्यातील जवळपास ८०,००० अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या-विमुक्त जाती व विशेष मागास प्रवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित ठरले असणे, त्यातील बरेच कर्मचारी पदोन्नतीविनाच निवृत्त झाले असणे, यामुळे राज्यातील मागासवर्गीय कर्माचाऱ्यांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री.मिहीर कोटेचा, पराग शाह, अतुल भातखळकर, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री. छगन भुजबळ, रोहित पवार, अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील वाढते प्रदूषण ही एक चिंतेची बाब असली तरी आता दिल्लीलाही मागे टाकत मुंबईने जगभरातील प्रदूषित शहरांच्या यादीत दुसरे स्थान मिळवले आहे, 'स्विस एअर ट्रॅकिंग इंडेक्स' नुसार, दिनांक २९ जानेवारी ते ८ फेब्रुवारी दरम्यान जगातील सर्वात प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई दुसऱ्या क्रमांकावर आहे, दिनांक २९ जानेवारी, २०२३ रोजी सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई १० व्या स्थानावर होती, दिनांक ८ फेब्रुवारी रोजी सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई दुसऱ्या स्थानावर पोहोचली, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रदूषणाबाबत मुंबईने भारतातील सर्वात प्रदूषित शहर असलेल्या दिल्लीलाही मागे टाकल्याचे स्विस एअर ट्रॅकिंग इंडेक्सनुसार दिसून आले आहे, निरी आणि आयआयटीवीच्या २०२० च्या अभ्यासानुसार, मुंबईच्या हवेतील कणांच्या भारांपैकी ७१ टक्क्यांपेक्षा जास्त रस्ते किंवा बांधकामांचा वाटा आहे, उर्वरित प्रदूषण औद्योगिक आणि ऊर्जा युनिट्स, विमानतळ आणि कचरा डंपमधून होते, हे वाढते प्रदूषण श्वसनाचे आजार असलेल्यांसाठी त्रासदायक ठरू शकते, त्यामुळे अशा

अस्वाक्षरित प्रत

व्यक्तींनी व रुग्णांनी काळजी घेण्याची गरज असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत आयक्यू एअर, युएनईपी आणि ग्रीनपीस यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील माहितीनुसार मुंबईतील हवेची गुणवत्ता मोजली, तसेच, त्याचे यूएस हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार 'निरोगी' अस्वास्थ्यकर' आणि धोकादायक' असे वर्गीकरण केले, यानुसार, गेल्या तीन वर्षाच्या हिवाळ्याच्या तुलनेत यावर्षी नोव्हेंबर ते जानेवारी दरम्यान मुंबईतील हवा 'खराब' आणि 'खूप खराब' होती, तज्ज्ञांच्या मते, कार, रस्ते आणि बांधकाम प्रकल्पांमधून सतत होणारी धूळ आणि धूर हे हवेची गुणवत्ता ढासळण्याचे मुख्य कारण आहे, मुंबईतील प्राधिकरणांनी वाहने आणि बांधकाम साइट्समधून उत्सर्जन कमी करण्यासाठी त्वरित पावले उचलली पाहिजेत, राज्य शासनाने वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी कठोर नियम लागू करणे आवश्यक असून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

**(५) श्री.मंगेश कुडाळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

''महाराष्ट्र जमीन महसूल नियम २०१९ मध्ये भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींना भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याकरता दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी अधिसूचना काढण्यात येणे, सदर भोगवटादार वर्ग रूपांतरित करण्याकरिता अधिसूचनेमध्ये २ वर्षाचा कालावधी देणे, सदर अधिसूचनेत रूपांतरित करण्याकरिता वर्गवारीनुसार बाजार मूल्याच्या १० ते १५ टक्के रक्कम आकारणे, या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये गृहनिर्माण संस्थांकडून हस्तांतरण करता अर्ज सादर न होणे, दिनांक ८ मार्च, २०२२ ला सदर अधिसूचनेचा कालावधी संपणे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३ च्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिनांक ७ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणे, दोन वर्षाच्या मुदत वाढीचा प्रस्ताव असून देखील एकच वर्ष मुदतवाढ मिळणे, हस्तांतरणाची प्रक्रियेकरिता सदस्यहस्तांतर होणे गरजेचे असणे, सदस्य हस्तांतरणाच्या कालावधी जास्त वेळ लागणे, पुढील एक वर्षांमध्ये जमीन हस्तांतरण करणे कठीण असणे, तीन ते चार वर्षाची मुदतवाढ मिळावी अशी नागरिकांकडून मागणी असणे व जीर्ण झालेल्या इमारतीच्या गृहनिर्माण संस्थांना दहा ते पंधरा टक्के ऐवजी अडीच टक्के बाजार मूल्याचे शुल्क आकारणे अशी नागरिकांची मागणी असणे, धोरणात त्रुटी असल्याकारणाने पुनर्विकास होत नसल्याने जीर्ण असलेल्या इमारतींमध्ये जेष्ठ नागरिकांना राहावे लागणे, या सर्व प्रकारामुळे रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व उपाययोजना.''

अग्रिम प्रत

**(६) श्री.समाधान अवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"माहे फेब्रुवारी, २०२३ च्या सुमारास माझ्या पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील भोसे व इतर ३९ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सन २०२१ पासून बंद असल्याचे निदर्शनास येणे, सदर योजनेस दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत माहे जून, २०१८ मध्ये ही योजना कार्यान्वीत झालेली असणे, या योजनेची कामे अपूर्ण असताना देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणे राजकीय दबावापोटी तत्कालीन निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन सदर योजना सोलापूर जिल्हा परिषदेकडे दिनांक २६/०५/२०२० रोजी हस्तांतर करणे, जिल्हापरिषदेने देखील कोणतीही शहानिशा न करता योजना ताब्यात घेणे,जिल्हा परिषदेने दिनांक ०८/०३/२०२१ रोजी शिखर समितीची स्थापन करणे, सदर शिखर समितीने दिनांक ०५/०४/२०२१ ते १७/०६/२०२१ पर्यंत म्हणजे २ महिने १२ दिवस ही योजना चालविणे, त्यानंतर विज देयक न भरल्याने दिनांक १८/०६/२०२१ रोजी विजजोडणी तोडण्यात आलेली असणे, सदरची योजना बंद असली तरी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीकडून विज बिल मात्र आकारले जात असणे, फेब्रुवारी, २०२३ अखेर रु.१,१७,००,०००/- (अक्षरी एक कोटी सतरा लाख) विद्युत देयक थकीत असणे, सदर योजनेचे थकीत विज बिल भरलेशिवाय ही योजना चालू करणे अशक्य असणे, सद्यास्थितीत सदर योजनेत समवेश असलेल्या ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती साधारण असल्यामुळे इतकी मोठी रक्कम त्यांचे तर्फे भरणे जवळपास अशक्यच असणे, सदरची योजना बंद अवस्थेत असल्याने सदर योजनेतील अनेक गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे ही योजना चालू करणे अत्यंत गरजेचे असणे, म्हणून भोसे व ३९ गावे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना ता. मंगळवेढा या योजनेचे रु.१,१७,००,०००/- थकीत विजबिल माफ होणेबाबत येथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधी या नात्याने केलेली विनंती, यावर शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री.नितीन पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग कळवण यांच्या अखत्यारित पॅकेज न. एनएसके-५४ (**A & B**) नाशिक जिल्ह्यातील सटाणा कळवण दिंडोरी निफाड व सिन्नर तालुक्यातील नामपूर-सटाणा-कळवण-वणी पिंपळगाव निफाड सिन्नर रस्ता रामा २७ कि.मी. 0/00 ते ७३/८०० ची सुधारणा करणे, सटाणा, कळवण, दिंडोरी, निफाड व सिन्नर जि. नाशिक (ब) नाशिक दिंडोरी, वणी प्रमुख राज्य क्रमांक ३ कि.मी. १०/७५० ते ४२/५०० रस्ता दिंडोरी ते वणी ची सुधारणा करणे या कामास सन २०१७ मध्ये

प्रशासकीय मान्यता देवून मंजुरी देण्यात येणे, सदर रस्त्यास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, नाशिक यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी संबंधित मक्तेदार एजन्सीस कार्यारंभ आदेश देणे, मुळ प्रकल्पाची किंमत १९४.९२ कोटी इतकी असणे हा रस्ता कळवण शहरातून जात असणे, कळवण शहर हे तालुक्याचे ठिकाण असून सन २०१७ ते २०१९ या दोन वर्षाच्या काळात या ना त्या कारणाने रस्ता दुर्लक्षित राहिल्याने प्रत्यक्ष काम हे ठेकेदाराच्या चुकीमुळे संथ गतीने सुरु होणे, रस्त्याच्या कामात होणाऱ्या विलंबामुळे नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागणे, या रस्त्याचा खर्च ४० टक्के सरकार तर ६० टक्के खासगी सहभागातून केला जाणार असणे, त्यात १५ वर्षे रस्त्यांची देखभालही ठेकेदाराला करावी लागणार असल्याचे करारनाम्यात नमूद असणे असे असतांना देखील सदरचा रस्ता गेल्या ५ वर्षापासून रस्त्याचे काम खोळबंणे, सदरचा रस्ता संबंधित मक्तेदार एजन्सीने वेळेत पूर्ण न करणे, ठेकेदाराच्या दिरंगाईस सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठीशी घालणे, वेळोवेळी संबंधित मक्तेदार एजन्सीस कामास मुदतवाढ देणे, रस्त्याच्या संथगतीमुळे व रस्त्याच्या धुळीमुळे स्थानिक नागरिकांना फुफुसाचे आजार होणे, रस्त्याचे काम वेळोवेळी बंद ठेवल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली नाराजीचे वातावरण, याच मार्गावर साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले श्री सप्तश्रृंगी देवीचे पीठ असून या ठिकाणी देशभरातून भाविक दर्शनासाठी येत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असणे परंतु सदर रस्त्याचे काम संथगतीने होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होणे, ऑक्टोबर महिन्यात ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे २ निष्पाप नागरिकांना याच रस्त्यावर अपघात होवून आपला जीव गमवावा लागणे, परिणामी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी कळवण शहर बंद ठेवून संबंधित मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची तहसिलदार व कळवण पोलीस स्टेशनकडे मागणी करणे, स्थानिक लोकप्रतिनीधींनी देखिल जिल्हा वार्षिक सभेत मा. पालकमंत्री यांच्या ही गोष्ट निदर्शनास आणून देवून मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करणे, पालकमंत्री यांनी देखिल संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणे , पालकमंत्री यांनी आदेश देवून देखिल सदर मक्तेदार एजन्सीवर कोणतीही कारवाई न होणे, या सर्व कारणांमुळे नागरिकांत प्रशासनाविरोधात व शासनाविरोधात असंतोषाचे वातावरण तयार होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(८) श्री.महेश शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“महाराष्ट्राचे दैवत असलेल्या खंडोबा व ज्योतिबा आणि इतर देवस्थाने हे लाखो भाविकांचे श्रध्दास्थाने असणे, या देवतांची पूजा ही भंडाराची आणि गुलालाची उधळण करत करणे, याकरिता पिवळया व लाल रंगाच्या घातक केमिकलचा वापर

अस्वाक्षरित प्रत

भंडारा व गुलालामध्ये करण्यात येणे, या भंडाऱ्यांची विक्री ही देवस्थानाच्या बाहेर करण्यात येत असून सदरचा भंडारा हा हळद समजून भंडाऱ्यांचा वापर पूजेला व अंगावर लावण्यासाठी करण्यात येणे, परंतु सदरचा भंडारा हा शरीरासाठी अपायकारक असून लाकडाच्या भुश्यामध्ये अत्यंत घातक अशी रसायने त्यामध्ये मिसळून पिवळा व लाल रंग आणण्यात येणे, सदरची रसायने ही कॅन्सरला आणि श्वसनाच्या रोगाला उद्युग्त करणारी असून यावरती तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता, भंडाऱ्याच्या जागेवर शेतकऱ्यांनी पिकविलेली खरी हळद वापरली तर हळदीच्या गुणधर्मानुसार सदर भक्तांच्या शरीरावर चांगला परिणाम होईल आणि शेतकऱ्यांच्या हळदीला एक चांगली बाजारपेठ मिळून शेतकऱ्यांना याचा फायदा होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५८१८३ "**बुलढाणा जिल्ह्यातील विद्यार्थी स्वाधार योजनेपासून वंचित असल्याबाबत.**"

**(ब) तारांकित प्रश्न.**

**(क) बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री** : **(क)** महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचे सन २०२१-२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

अप्रकाशित प्रत

**(ख)** महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचा सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या वर्षांचे अनुक्रमे अठरावा, एकोणीसावा व वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) खनिकर्म मंत्री** : जिल्हा खनिज प्रतिष्ठान, वर्धा, अकोला, सातारा, चंद्रपूर, अमरावती, ठाणे, यवतमाळ, मुंबई उपनगर, रत्नागिरी, कोल्हापूर, तसेच प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना जिल्हा खनिज प्रतिष्ठान, सांगली या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उद्योग मंत्री** : **(क)** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०१९-२०२० या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०१९-२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : महाराष्ट्र एचआयव्ही व एड्स (लोकपाल व कायदेशीर कार्यवाही) नियम, २०२२ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एनिका-२०१८ / प्र.क्र.१३३ / कु.क., दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा. (मंत्र्यांचे उत्तर)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्री.सुनिल टिंगरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे महापालिकेत २०१७ मध्ये हद्दीतलगतच्या ११ गावांचा समावेश करण्यात आला असणे, त्यानंतर पुन्हा सन २०२१ मध्ये आणखी २३ गावांचा समावेश करण्यात आला असणे, गेल्या पाच वर्षांत जवळपास ३४ गावे पुणे महापालिकेत आली असून, ही गावे पालिकेत समाविष्ट करण्याबाबत राज्य सरकारनेच उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दिले असणे, त्यानुसार ही गावे घेण्यात आली आहे. या समाविष्ट गावांमध्ये पाणी, रस्ते, ड्रेनेज, विद्युत व्यवस्था, उद्याने अशा पायाभूत सोयी-सुविधांची प्रचंड गैरसोय होतं असणे, महापालिकेच्या माध्यमातून हे प्रश्न सुटतील अशी येथील नागरिकांची भावना असणे, मात्र, महापालिकेत येऊनही या गावांचा विकास होऊ शकलेला नसणे, पहिल्या टप्यात आलेल्या ११ गावांसाठी एक प्रभाग करण्यात आला असणे, त्यात केवळ दोन नगरसेवकाना प्रतिनिधित्व मिळाले मात्र तब्बल ३२ किमीचा भौगोलिक परिसर असलेल्या या गावांच्या प्रभागाला या नगरसेवक न्याय देऊ शकलेले नसणे, तर उर्वरित २३ गावांना पालिकेचे लोकप्रतिनिधीत्व मिळू शकलेले नाही. त्यात गेल्या वर्षभर पालिकेवर प्रशासक राज असणे, त्यामुळे अगदी छोट्या-छोट्या समस्याही सुटू शकत नसणे, गावांना सोयी-सुविधा देताना महापालिकेकडून निधी नसल्याची ओरड केली जात असणे, तर राज्य शासनाकडून अद्याप मदत मिळालेली नाही. त्यामुळे या समाविष्ट गावांमध्ये प्रचंड नाराजीची लोकभावना असणे, या गावांना विकासाचा न्याय देण्यासाठी राज्य शासनाने ठोस कार्यवाही करण्याची गरज असणे, तसेच महापालिकेने या गावांसाठी अंदाजपत्रकात स्वतंत्र अशी योजना आणण्याची गरज असणे, या समाविष्ट गावातील नागरिकामध्ये शासन बाबत नाराजी दिसून येणे, या संदर्भात शासनाची तातडीनं करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.हिरामण खोसकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक मधील त्र्यंबकेश्वर येथील गोदावरी नदीला जाऊन मिळणाऱ्या जलस्त्रोतामध्ये पालिकेचे सांडपाणी सोडले जात असल्यामुळे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, येथे दरवर्षी ४५ ते ५० लाख लिटर सांडपाणी तयार होणे, मात्र १० लाख लिटर सांडपाणी प्रक्रिया करुन नदीमध्ये सोडले जाणे व उर्वरित सांडपाण्यामुळे नदीचे पाणी मोठया प्रमाणात प्रदूषित होत असून ते पाण्याच्या गुणवत्तेच्या प्राथमिक निकषानुसार आंघोळीसाठीही योग्य नसल्याची बाब उघडकीस येणे, मात्र येथील नागरिकांना हे दूषित पाणी प्यावे लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्याला मोठया प्रमाणात

धोका निर्माण होत असल्याचे आढळून येणे, यामुळे नदीत सांडपाणी सोडण्यास विरोध करण्यात येत असणे, सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच नदीत सोडण्यात येणारे सांडपाणी रोखण्याबाबत शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष व विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने नदीतील प्रदूषण रोखण्याबाबत तसेच प्रक्रिया न करता सांडपाणी सोडणाऱ्या संबधितांवर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री.शांताराम मोरे, प्रकाश सोळंके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुंज अधिसूचित क्षेत्राकरिता सन १९९१ मध्ये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झाल्यानंतर सिडकोने सन १९९६ पासून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करणे यासाठी सन १९९८, २००० व २०१२ मध्ये भूसंपादनासाठी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध होणे, यातील काही जमिनींचे आगाऊ ताबे घेऊन त्यावर विकास कामे करणे, परंतु भूसंपादनाची कार्यवाही अद्यापही पूर्ण न होण, जमीन मालकांना कोणत्याही प्रकारे मोबदला न देणे, सिडको ने मार्च, २०२० मध्ये ठरावाद्वारे प्रकल्पातील प्रलंबित भूसंपादनाची कार्यवाही परत घेण्याचा आणि नव्याने कोणत्याही जमिनीचे संपादन न करण्याचा निर्णय होणे, परंतु त्याचप्रमाणे कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणे, जमीन धारकांच्या जमिनी जाणीवपूर्वक संपादनाच्या फेऱ्यात अडकवून ठेवून त्यांना विकास परवानगी न देणे, विकास परवानगी व सोयी सुविधा मिळवण्यासाठी सिडको कार्यालयासमोर वेळोवेळी आंदोलन होणे,मोर्चे निघणे, संपादनाच्या फेऱ्यात अडकलेल्या जमिनींच्या विकास कामांना परवानगी देणे बाबत शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे सिडको कडून जमीनधारकांना कारण देणे बऱ्याच जमीन धारकांनी याबाबत माननीय उच्च न्यायालयात धाव घेणे, माननीय उच्च न्यायालयाने प्रलंबित भूसंपादनाबाबत शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२३ पूर्वी निर्णय घ्यावा असे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी आदेश देऊनही याकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष सिडकोने प्रकल्पाचा आर्थिक व्यवहारता अहवाल शासनास सादर करणे, प्रकल्प आर्थिक दृष्ट्या सुसह्य ठरत नसल्याने प्रलंबित असलेल्या १२४ हेक्टर क्षेत्रापैकी केवळ विकास कामे झालेले ७.३० हेक्टर क्षेत्राचे गुण संपादन पूर्ण उर्वरित क्षेत्रातील संपादन न करण्याच्या निर्णयावर सिडको ठाम राहून त्यासाठी शासनाची परवानगी मागणे, शासनाने सन २०२२ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सदर विषयी उपस्थित केलेल्या मुद्यावर उत्तर देताना सिडकोच्या सदर निर्णयास सहमती असल्याचे आणि प्रकल्पातील आवश्यक त्या सोयी-सुविधा काल बद्दल वेळेत पूर्ण करण्यासाठी सदर अधिवेशन समता पंधरा दिवसाच्या आत लोकप्रतिनिधी समवेत बैठक आयोजित करण्याबाबत सभागृहात आश्वासन देणे, परंतु या दोन्ही आश्वासनाची पूर्तता न करणे, माननीय उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश तसेच, या सार्वभौम सभागृहात आश्वासन देऊन

सुद्धा या प्रलंबित प्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याने भूधारकांमध्ये शासन सिडको यांच्याबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे व या सभागृहात दिलेले आश्वासनांचे तात्काळ पालन करून या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) सर्वश्री.जयंत पाटील, मानसिंग नाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सांगली जिल्हयातील वाळवा व शिराळा तालुक्यातील बिबटयाचा वावर वाढलेला असून वाळवा तालुक्यात दिनांक १ जानेवारी, २०१९ ते फेब्रुवारी, २०२३ अखेरपर्यंत ७७ बिबटया व वन्यप्राण्यांपासून ५०० पेक्षा अधिक पशुधनांना ठार केलेले असणे,यापूर्वीसुध्दा ऊसतोड कामगारांच्या लहान मुलांना जखमी करुन सुफीयान शमशुद्दीन शेख, या १ वर्षाच्या मुलाला हल्ला करुन या हल्ल्यात बालक मृत्युमुखी पडणे, त्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व पसरलेले भितीचे वातावरण, आता वन्यप्राण्यांनी विशेषत: मानवावर चढवलेले हल्ले पाहता या वन्यप्राण्यांचा त्वरित बंदोबस्त करण्याची तेथील नागरिकांची होत असलेले मागणी, या बिबटयाचा व वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत जलद कृती दल स्थापन करुन बिबटया निर्वारण केंद्र उभारण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ५ ते ८)**

**(५) श्री.नितेश राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नगर शहरातील रामवाडी परिसरातील गेल्या अनेक वर्षांपासून तेथील दलित समाजातील लोकांवर मुस्लिम लोकांनी अत्याचार करत असणे, तसेच तेथील दलित लोकांना रामवाडी वस्तीतून पलायन करण्यास भाग पाडणे, तसेच रामवाडी भागाचे नाव तेथील काही समाज कंटकांनी हिमायतनगर करणे, सदरील सर्व जागा आर्मी कॅन्टोन्मेंटची असणे, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री नगर शहरातील अशोक लोंढे नामक व्यक्तीने औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजी महाराज झाले यासंदर्भात असणाऱ्या पोस्टचे स्टेटस व्हॉट्सअॅप ला ठेवले यावरून मुस्लिम जमावाने त्यांच्यावर पूर्वनियोजित एकत्रित होऊन हल्ला करणे, आणि त्याच्या डोक्यात, पोटात व कानामागे तलवारीने वार करणे, त्यानंतर सदर जमाव अशोकच्या बहिणीच्या घरी जाऊन त्यांचा विनयभंग करून घरातील तोडफोड व त्यांना मारहाण करणे, त्यानंतर तेथून सर्व जमाव रोहित जगताप

अग्रिम प्रत

नावाच्या व्यक्तीच्या घरात घुसून त्यांना व घरातील महिलांना मारहाण करून त्यांचा विनयभंग करून घरातील मंदिराची आणि देवी देवतांची विटंबना करणे, त्यानंतर एक कार्यकर्ता हिंदुत्ववादी काम करणारा कुणाल भंडारी नामक व्यक्ती रस्त्याने जातांना घडलेली घटना बघत असताना थांबला तर हा पण हिंदुत्ववादी कामांमध्ये सक्रिय असतो असे म्हणून तेथील त्या जमावाने कुणालला देखील मारहाण करणे, तसेच त्यातील एका मौलानाने फोन कुणाल भंडारीच्या कानाला धरून बोलला की अफजल पैलवानसोबत बोलायला सांगितले परंतु कुणालने अफजल सोबत बोलायला नकार दिल्यानंतर तेथील जमावाने धारदार शस्त्राने कुणालच्या पोटात कोयत्याने वार करून लोखंडी रॉड ने मारहाण करणे, त्यानंतर दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री पुन्हा मुकुंद नगर मधील इमरान माव्या वाला याने रामनगर मध्ये येऊन याच जमावाला सोबत घेऊन राजू भोईटे नामक व्यक्तीला जबर मारहाण करून डोक्यात आणि चेहऱ्यावर रॉडचे वार करणे, सदर घटनेतील एक समीर शेख नावाचा एक मौलाना आहे जो या घटनेतील आरोपी आहे त्याच्या इंस्टाग्राम वरील पोस्ट सर्व हिंदू विरोधी असणे, तसेच आरोपी अफजल शेख नावाचा जो आरोपी आहे तो पोलिसांवरती दबाव तंत्राचा उपयोग करत मुस्लिम लोकांना,महिलांना एकत्रित करून पोलीस स्टेशन ला पाठवून पोलिसांवर दबाव आणणे, तसेच अफजल शेख मोठ्याप्रमाणात लव जिहाद, land जिहाद कारवायांमध्ये सक्रिय असणे, मुस्लिम मुलांना लव जिहाद, देशविरोधी कारवायांसाठी फंडींग करणे, घटनेतील सर्व आरोपींचा टोळी माफिया प्रमुख अफजल शेख हा असून याचा भाऊ मुदस्सर हा तेथील रामनगर भागाचा नगरसेवक असून याच्याच वडिलांनी शिवजयंती च्या दिवशी शेवगाव भागातील एका हिंदू कहार समाजाच्या मुलाला घरावर भगवे झेंडे लावले म्हणून मारहाण केलेली असणे,आणि पोलिसांनी कारवाही न करणे, तसेच इतकी गंभीर घटना घडलेली असतांना देखील काही आरोपींना अद्याप पोलिसांनी अटक केलेली नसणे, तसेच साल २०१७ ते २०१८ सुमारास नगर एसपी कार्यालय तोडफोड प्रकरणातील आरोपी अफजल शेख नावाच्या व्यक्तीने एफ.आय.आर मधून नाव वगळण्यासाठी स्थानिक पोलिसांना पैसे देण्याचा प्रयत्न करणे, तसेच संबंधित घटनेच्या विरोधात स्थानिक दलीत हिंदू नागरिकांनी नगर शहरात मोर्चा काढणे, परंतु मोर्चात काही मुस्लिम महिलांनी हिंदू दलीत महिलांना शिवीगाळ करणे, त्यानंतर हिंदू महिला पोलिस स्टेशन ला तक्रार द्यायला जाणे, मात्र पोलिसांनी एट्रोसिटी घेणे अपेक्षित असतांना त्या ठिकाणी साधी एन.सी. न घेणे, तसेच याबाबत कार्यवाही व्यवस्थित न झाल्यास महाराष्ट्रात तीव्र आंदोलन होणार असल्याचे पत्र शासनास हिंदुत्ववादी संघटनांनी देणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व उपाययोजना.”

अग्रिम प्रत

**(६) श्री.अमित साटम, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

''मुंबई उपनगरातील अंधेरी (प) जूहू गल्ली येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हा डिएचएफएल कंपनीच्या अंतर्गत असून सदर प्रकल्पामध्ये सूमारे ३६ सोसायटया व ५२०० पेक्षा अधिक झोपडपट्टीवासीयांचा परिशिष्ठ २ तयार असणे, सदर विषयामध्ये किमान ५०० ते १००० घरे ही पुर्नविकासाकरिता तोडली असणे, गेल्या अनेक वर्षापासून तोडलेल्या घरांच्या घर मालकांना भाडे सुध्दा आकारण्यात आलेली नसणे, तसेच मोठया प्रमाणावर आपल्या घराबाहेर असलेल्या कुटूंबांची हेळसांड होणे, सदर प्रकल्प हा गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असून डिएचएफएल कंपनीच्या ईडीच्या प्रकरणामध्ये सदर विषय अडकला असणे, डिएचएफल कंपनी ही एनसीएलटी मधून दुसऱ्या एका कंपनीने ताब्यात घेऊन सुध्दा अद्यापपर्यंत सदर झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पाला चालना न मिळाल्यामुळे सदर गलिच्छ वस्तीमधील नागरीक अत्यंत हलाखीचे जीवन जगत असल्यामुळे शासनाने सदर विषयामध्ये मध्यस्थी करुन स्वत: शासनाने सदर प्रकल्प आपल्या अखत्यारीमध्ये घेऊन सदर प्रकरणामध्ये असलेल्या सर्व भागधारकांशी चर्चा करणे, वाटाघाटी करुन सदर व्यवहार सुरळीतपणे करुन ५२०० पेक्षा अधिक झोपडपटटीवासीयांना स्वत:चे हक्काचे घर तयार करुन शासनानेच सदर प्रकल्प पुढे नेण्याची गरज असल्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

**(७) श्री.भिमराव तापकीर, ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणाच्या पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे वाढत असणे, अतिक्रमणांचे पुनर्सर्वेक्षण होण्याची आवश्यकता, पाटबंधारे विभागाकडे अतिक्रमणांची अद्ययावत माहिती उपलब्ध नसणे, जलसंपदा विभागाने धरणाच्या पाणलोटक्षेत्राबाहेरील पाटबंधारे विभागाच्या जमिनीची मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडे कोट्यावधी रुपयांचे चलने भरून तसा वारंवार पाठपुरावा करून देखील मोजणी प्रक्रिया सुरु झालेली नसणे, मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणक्षेत्रातील जमिनींवरील अतिक्रमणांना पाठबळ मिळत असणे, जमिनीच्या मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणाच्या पाणलोटक्षेत्रात जलसंपदा विभागाची नेमकी कोठे व किती जमीन आहे याची माहिती मिळत नसल्याने जलसंपदा विभागाच्या बहुतांश जमिनीवर, ओढ्या-नाल्यावर खाजगी व्यावसायिक स्वरुपाची अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास येत असणे, आजमितीस बहुतांश पूररेषा आणि पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे, बांधकामे झाली असणे, तसेच खडकवासला धरणाचे जलप्रदुषणात देखील वाढ झाली असून धरण व पाणलोटक्षेत्र व परिसरात कंपन्या, रेस्टॉरंट, रिसोर्ट व इतर व्यावसायिक स्वरूपाच्या बांधकामांमध्ये पूर्ण

क्षमतेने सिवेज ट्रिटमेंट प्लांट व तद्नुषंगिक आवश्यक असणाऱ्या उपाययोजना न केल्याने राजरोसपणे सांडपाणी आणि कचरा व राडारोडा मिसळला जात असणे, धरणाचे जलप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सांडपाणी समस्या आणि घनकचरा व्यवस्थापन करिता कृती आराखडा करण्यात आला नसल्याने जलप्रदूषणाचा स्तर वाढत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होणे, दुषित पाण्यामुळे त्यावर अवलंबून असलेले नागरिक व वनस्पती आणि प्राणी-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होणे, धरणाच्या व धरणाकडे येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न अतिशय गंभीर झाला असणे, धरणाची हद्द संरक्षित नसल्यामुळे जलप्रवाह आणि पाणलोटक्षेत्रात व कॅनॉल मध्ये बुडून अनेकांचा बळी गेला असणे, खडकवासला धरण हे सुरक्षित नसून धरणाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करत जलसंपदा विभाग पुणेकरांच्या जीवाशी खेळत असणे, सीसीटीव्ही, सुरक्षारक्षक, माहिती फलक, संरक्षण जाळी, संरक्षण भिंतीसारख्या प्राथमिक गरजा देखील पूर्ण करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास येत असणे, जलसंपदा विभागाचा लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय नसणे याकडे जलसंपदा विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) ॲड. अशोक पवार, सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्हयातील शिरुर व खेड तालुक्याला वरदान ठरलेल्या चासकमान डावा कालवा १४४ किलोमिटर अंतराचा असून कालव्यामध्ये झाडेझुडपे व कॅनोल अस्तरीकरणाच्या अभावी आवर्तनाच्या वेळी लाखो लिटर पाणी वाया जाणे, चासकमान कॅनोलमध्ये दगड माती पडून कॅनोलची रुंदी व खोली कमी होणे तसेच झाडाझुडपांनी अनेकांच्या पोटचाऱ्या गाडून टाकणे, सदरचा कालवा हा रोजगार हमी योजनेतून झाला असल्याने प्रकल्पाची अपूर्ण कामे पूर्ण होणे गरजेचा असणे, कॅनोलमधील पाणी गळतीचे प्रमाण ४५ ते ४७ टक्के होत असून कालव्याच्या मुखातून सद्य स्थितीत ५५० क्युसेकने पाणी सोडण्यात येत असून टेल भागात अंदाजे ७० ते ९० क्युसेकने (पावसाळ्या व्यतिरिक्त) पाणी मिळणे, यामुळे हेड व टेल या दोन्ही भागातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, टेलच्या भागापर्यंत पूर्ण क्षमतेने पाणी पोहचण्यासाठी व कॅनोलची गळती रोखण्यासाठी तसेच चासकमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामासाठी, जलसेतू अस्तरीकरणासाठी, चाऱ्यांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**पाच : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"अर्थसंकल्पातील अनुदानासाठीच्या मागण्यांवर चर्चा व मतदानाच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम २५१ (१) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**सहा : सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (पहिला दिवस)**

(१) गृह विभाग

(२) जलसंपदा विभाग

(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

(४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सात : शासकीय विधेयके :**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(२)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(३)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(४)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३.

अस्वाक्षरित प्रत

**(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : ॲड. आशिष शेलार, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, सदा सरवणकर, अमित साटम, भरतशेठ गोगावले, अतुल भातखळकर, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री कालीदास कोळंबकर, किसन कथोरे, कुमार आयलानी, गणपत गायकवाड, गणेश नाईक, नितेश राणे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री पराग शाह, प्रशांत ठाकूर, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, माधुरी मिसाळ, सर्वश्री महेश चौघुले, मिहीर कोटेचा, राम कदम, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय केळकर, सुनील राणे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, चिमणराव पाटील, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, योगेश कदम, संजय गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या नाविन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भुमिपूजन होऊन कामही सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी. रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची ६ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भुमिपूजन मा.पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी. मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्दयामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पुर्ण होण्याचे

अप्रकाशित प्रत

स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकरप्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणाबाबत शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता, जेणेकरुन पदपथ मोकळे होऊन वाहतुक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांच्या पार्किंगकरिता बहुमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकिय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परिक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्त्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महापालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत

मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस रोडावल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महापालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १४ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

असुधारित प्रत